RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ११९ (५)] शुक्रवार, सप्टेंबर १, २०१७/भाद्र १०, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २७०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

दुसरा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ सप्टेंबर २०१७.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम.**

क्रमांक सीएलआर-०७१७/प्र.क्र.२१३/राउशु-३.––ज्याअर्थी, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५वा) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम (१९४९ चा मुंबई २५वा ) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (b) आणि (g) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना नियम " महाराष्ट्र देशी मद्य नियम (दुसरी सुधारणा) नियम, २०१७ " असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ (यापुढे यास प्रधान नियम असे संबोधावे) च्या नियम २४ मधील उप-नियम ४ मध्ये—

(i) खंड (a) मध्ये " १६ चौरस मीटर " या शब्दांऐवजी पुढील शब्दाचा अंतर्भाव करावा " पंचवीस चौरस मीटर "

(ii) खंड (a) नंतर पुढील खंडांचा समावेश करावा, जसे की,—

" (a-i) अर्जदार त्याच्या जागेत वाहने उभी करण्यासाठी पुरेशी सुविधा उपलब्ध असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करेपर्यंत; आणि

(a-ii) जागेसाठी मंजूर वाणिज्य अकृषिक वापर परवानगी सादर करेपर्यंत; आणि

(a-iii) सक्षम स्थानिक प्राधिकारी/नगररचना प्राधिकारी यांनी मंजूर केलेला जागेचा बांधकाम पूर्णत्त्वाचा दाखला सादर करेपर्यंत ” किंवा

(iii) खंड (d) मधील परंतुकामधील “ या उप-नियमामध्ये ” या शब्दानंतर पुढील शब्द व अक्षरे समाविष्ट करण्यात यावी, जसे की, “ खंड (a), (a-i), (a-ii) आणि (a-iii) याखेरीज.”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सहसचिव.

**HOME DEPARTMENT**

2nd Floor, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st September 2017.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. CLR-0717/C.R. 213/EXC-3.—Whereas, the Government of Maharashtra is satisfied that the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973 should be brought into force at once, and therefore the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section *(3)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949).

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses *(b)* and *(g)* of sub-section *(2)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973 as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Country Liquor (Second Amendment) Rules, 2017.

2. In rule 24 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973, in sub-rule (4),—

(1) in clause *(a)*, for the words "sixteen square meters" the words "twenty-five square meters" shall be substituted;

(2) after clause *(a),* the following clauses shall be inserted, namely :—

"*(a-i)* unless the applicant submit an affidavit that adequate parking facility is available at his premises; and

*(a-ii)* unless the premises has sanctioned commercial non-agricultural use permission; and

*(a-iii)* unless the premises has a construction completion certificate from the competent local/planning authority; or"

(3) in clause *(d),* in the proviso, after the words "in this sub-rule" the words and letters, " except clauses *(a), (a-i), (a-ii)* and *(a-iii)* " shall be inserted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.